आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२६ मे २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाच्या विकासासाठी आवश्यक प्रत्येक गोष्ट भारतातच उत्पादित व्हावी ही काळाची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / गुजरातमधे दाहोद इथून केलं २४ हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं लोकार्पण आणि भूमीपूजन

- केंद्रीय गृहमंत्री दोन दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर

- महाराष्ट्रासह अनेक भागात मोसमी पावसाचं आगमन, मुंबईसह कोकणात सर्वत्र मुसळधार पाऊस

**आणि**

- पहिल्या खेलो इंडिया बीच क्रीडास्पर्धांमधे महाराष्ट्राला दुसरा क्रमांक

**<><><><><>**

देशाच्या विकासासाठी आवश्यक प्रत्येक गोष्ट भारतातच उत्पादित व्हावी ही काळाची गरज आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी भारताचे प्रधानमंत्री म्हणून २०१४ मध्ये प्रथम शपथ घेतल्याच्या घटनेला आज ११ वर्षे पूर्ण झाली. याचं औचित्य साधून गुजरातमध्ये दाहोद इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. भारतीय रेल्वेच्या रेल्वे इंजीन उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटनासह, सुमारे २४ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण यावेळी मोदी यांच्या हस्ते झालं. देशातलं औद्योगिक उत्पादन आणि निर्यातही सातत्यानं वाढत आहे असं ते म्हणाले. स्मार्ट फोन, गाड्या, खेळणी, शस्त्रास्त्र, औषधं अशा अनेक वस्तू आपण इतर देशांना निर्यात करू लागलो आहोत, रेल्वे - मेट्रो आणि त्यासाठीचं आवश्यक तंत्रज्ञानही आपण स्वतःच बनवत असून ते निर्यातही करत आहोत असं ते म्हणाले. गुजरातसह देशभरताल्या कोट्यवधी नागरिकांनी दिलेल्या आशिर्वादाच्या शक्तीमुळेच मी

अहोरात्र देशाची सेवा करू शकत आहे. गेल्या काही वर्षात देशानं दशकांच्या बेड्या झुगारणारे अभूतपूर्व निर्णय घेतले असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

आज १४० कोटी भारतीय विकसित भारताचा संकल्प साध्य करण्यासाठी झटत आहेत असं ते म्हणाले.

या स्वदेशी रेल्वे इंजीन उत्पादन प्रकल्पात देशांतर्गत वापर आणि निर्यातीच्या उद्देशानं ९ हजार अश्वशक्ती क्षमतेच्या इलेक्ट्रिक रेल्वे इंजीनचं उत्पादन घेतलं जाणार आहे. या प्रकल्पातून येत्या ११ वर्षात बाराशे इंजिनांची निर्मिती करण्याचा उद्देश आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांनी या प्रकल्पातच तयार झालेल्या पहिल्या इलेक्ट्रिक रेल्वे इंजीनाला हिरवा झेंडाही दाखवला. या इंजिनामुळे भारतीय रेल्वेची मालवाहतूक क्षमता वाढणार आहे.  हे इंजिनांमध्ये पुनरुत्पादक ब्रेकिंग प्रणालीनं सुसज्ज असणार आहे. यामुळे कमी उर्जा वापराचं आणि पर्यावरणीय शाश्वततेचं उद्दिष्ट गाठण्यालाही मदत होणार आहे.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. या प्रकल्पात उत्पादित इंजिन उच्च गुणवत्तेचं आणि कमी खर्चात तयार केलं जातंय, त्यामुळे आपण त्याची निर्यातही करू शकणार आहोत. हे इंजिन म्हणजे एक चालतं फिरतं डेटा सेंटर आहे, असं अश्विनी वैष्णव यांनी यावेळी सांगितलं.

या कार्यक्रमाआधी प्रधानमंत्री वडोदरा इथं एका रोड शो मध्ये सहभागी झाले. यावेळी नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. जमलेल्या नागरिकांनी प्रधानमंत्र्यांवर पुष्पवृष्टी केला. ऑपरेशन सिंदूरमधे महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी यांचे कुटुंबिय देखील या रोडशोमध्ये सहभागी झाले होते.

प्रधानमंत्री आज संध्याकाळी भुज इथंही सुमारे ५३ हजार ४०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण करणार आहेत.

**<><><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं कतारमध्ये दोहा इथं शूरा परिषदेच्या उपसभापती डॉ. हमदा अल सुलैती आणि इतर कतारी खासदारांची भेट घेतली. शिष्टमंडळानं कतारच्या विधिमंडळाला ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली आणि दहशतवादा विरुद्धच्या जागतिक लढाईत पाठिंबा देण्याचं आवाहन केलं. हे शिष्टमंडळ येत्या काही दिवसांत दक्षिण आफ्रिका, इथिओपिया आणि इजिप्तला भेट देणार आहे.

खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाने बहरीनच्या शूरा कौन्सिलचे अध्यक्ष आणि उपप्रधानमंत्र्यांची भेट घेतली. खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं दक्षिण कोरियाला भेट दिली. खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं, न्यूयॉर्क इथं ९/११ स्मारकाला भेट देऊन दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना त्यांनी श्रद्धांजली वाहिली.

द्रविड मुनेत्र कळघम पक्षाच्या खासदार कनिमोळी यांच्या अध्यक्षतेखालच्या शिष्टमंडळानं मॉस्को दौरा यशस्वीपणे पूर्ण केला असून आता ते स्लोव्हेनियाकडे रवाना झाले आहेत. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त अरब अमिरातला गेलेल्या शिष्टमंडळानं आपला दौरा पूर्ण केला असून ते आता काँगोमध्ये पोहोचले आहेत.

**<><><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज नागपूरजवळ जामठा इथल्या राष्ट्रीय कर्करोग संस्थेत स्वस्ती निवासचं भूमिपूजन, कामठी इथं राष्ट्रीय न्यायवैद्यक विद्यापीठाची पायाभरणी झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

अमित शाह सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. काल रात्री त्यांचं नागपूरमध्ये आगमन झालं. आज ते नांदेडला रवाना होतील. नांदेड इथं माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण शहा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यानंतर ते शंखनाद या जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. नंतर अमित शहा मुंबईत येणार असून उद्या दक्षिण मुंबईतल्या माधवबाग लक्ष्मीनारायण मंदिराच्या दीडशेव्या वर्धापनदिन महोत्सवाला उपस्थित राहतील.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पावसानं आज मध्य अरबी समुद्र, महाराष्ट्राचा आणखी काही भाग, बेंगळुरूसह कर्नाटक, तमिळनाडूचे उर्वरित भाग, तेलंगण आणि आंध्र प्रदेशचा काही भाग व्यापला. तसंच मिझोराम, आसाम आणि मेघालयाचा काही भाग आणि संपूर्ण त्रिपुरा, मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल प्रदेशातही नैऋत्य मोसमी पाऊस सक्रीय झाला. मध्य अरबी समुद्र, महाराष्ट्र, तेलंगण, आंध्र प्रदेशाचे आणखी काही भाग, तसंच कर्नाटकाच्या उर्वरित भागांमध्ये नैऋत्य मोसमी पावसाला पुढे जाण्यासाठी अनुकूल परिस्थिती असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. कर्नाटकाचे काही भाग, केरळ, तमिळनाडू आणि पुदुच्चेरीत जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अंदमान आणि निकोबार, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातही आज पावसाचा अंदाज आहे. येते दोन ते तीन दिवस दिल्ली, आंध्र प्रदेश, गुजरात, हरियाणा, चंडीगड, हिमाचल प्रदेश, झारखंड, पंजाब आणि राजस्थानात विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहतील. राजस्थानात उष्णतेची लाट आणि धुळीची वादळं येण्याचा अंदाज आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र मध्य प्रदेश आणि झारखंडमधे सोसाट्याच्या वाऱ्यांसह विजांचा कडकडाट आणि जोरदार पाऊस होत आहे.

महाराष्ट्रात मोसमी पावसाचं आगमन  नेहमीच्या वेळेच्या १० दिवस आधीच झालं असून कोकणात सर्वत्र तसंच सोलापूर, सांगली इत्यादी ठिकाणी जोरदार पाऊस होत आहे. राजधानी मुंबईत कालपासून वादळी पाऊस होत असून जनजीवन विस्कळीत झालं आहे. शहराच्या सखल भागात पाणी साचल्यानं वाहतुकीचा खोळंबा होत आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या रुळांवर अनेक ठिकाणी पाणी साचल्यानं रेल्वे सेवा प्रभावित झाली आहे. सकाळी कार्यालयात जाणाऱ्या नोकरदारांचे त्यामुळे हाल झाले. कोकणातल्या सर्व जिल्ह्यांमधे मुसळधारपावसामुळे नद्या भरुन वाहू लागल्या आहेत. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पुढचे काही दिवस जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. राज्यात ठिकठिकाणी मुसळधार पाऊस सुरू असून प्रशासनानं सतर्क राहून मदत कार्य करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. शिंदे यांनी ठाणे जिल्हा तसंच अधिक पाऊस पडत असलेल्या जिल्ह्यांच्या परिस्थितीचा आढावा घेतला, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. पावसामुळे जनजीवन विस्कळीत होऊ नये, तसंच कोणतीही जीवित किंवा वित्तहानी होऊ नये, यासाठी प्रशासनानं वेळेवर आणि प्रभावीपणे कार्य करावे असे निर्देश त्यांनी दिले. या परिस्थितीवर शासनाचं लक्ष असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व उपाययोजना राबवण्यात येत असल्याचं उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

झारखंडमध्ये लातेहार भागात पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत सीपीआय माओवादी संघटनेचा कमांडर मनीष यादव ठार झाला आहे. मनीषवर पाच लाख रुपयांचं बक्षीस जाहीर झालं होतं. दरम्यान, या कारवाईत कुंदन खेरवार या अन्य एका माओवाद्याला अटक करण्यात आली असून त्याच्यावर १० लाख रुपयांचं बक्षीस होतं. काल रात्री झालेल्या चकमकीत जेजेएमपी या संघटनेचा कमांडर पप्पू लोहरा हा ठार झाला. त्याच्यावरही १० लाख रुपयांचं बक्षीस जाहीर झालं होतं.

**<><><><><>**

दीवच्या समुद्र किनाऱ्यावर झालेल्या खेलो इंडिया बीच क्रीडा स्पर्धेची काल सांगता झाली. या पहिल्याच बीच स्पर्धेत महाराष्ट्राने ५ सुवर्ण पदकांसह, ५ रौप्य , आणि १० कास्य अशी एकंदर २० पदकं जिंकत उपविजेतेपद पटकावलं. मणिपूर संघाला विजेतेपद मिळालं. महाराष्ट्राने पेंचक सिलटमध्ये ३ सुवर्ण, ४ रौप्य आणि ५ कास्य अशी एकंदर १२ पदकांची कमाई करीत वर्चस्व गाजवले. सागरी जलतरणातही २ सुवर्ण, १ रौप्य आणि २ कास्य पदकं मिळवली. बीच सॉकर, बीच कबड्डी या सांघिक खेळात कांस्य पदकावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नाव कोरलं. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला उपविजेतेपदाचा करंडक प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

आय पीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स या संघांचा सामना जयपूरला सवाई मानसिंग स्टेडीयमवर होणार आहे. खेळ संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

**<><><><><>**

गाझाच्या मध्य भागात विस्थापितांसाठी आश्रय असणाऱ्या शाळेवर काल रात्री इस्रायलकडून झालेल्या हवाई हल्ल्यांमध्ये २४ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये

लहान मुलांचा समावेश आहे. दरम्यान, येमेनच्या हुथींनी इस्त्रायलच्या मुख्य आंतरराष्ट्रीय विमानतळावर क्षेपणास्त्रांचा हल्ला केल्याचा दावा केला आहे.

**<><><><><><>**

युरोपियन महासंघाबरोबर टॅरिफवाढीसंदर्भात वाटाघाटी करण्यासाठीच्या अंतिम मुदतीत ९ जुलैपर्यंतची वाढ करायला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सहमती दिली आहे.

**<><><><><><>**

अर्जेंटिना इथे सुरू असलेल्या चार देशांच्या मैत्रीपूर्ण हॉकी स्पर्धेत भारताच्या कनिष्ठ गटातल्या महिला संघाने उरुग्वे संघाचा ३-२ असा पराभव केला आहे.

**//<><><><><><>//**